I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** पंढरपूर शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0030 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 01:25 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 13/01/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/01/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 14:14 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:21 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 21/01/2025 **Time (वेळ):** 00:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 01:25 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** प्रांत कार्यालय पंढरपुर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अविनाश गोरख बाबर

**(b) Father's Name (चे नाव ):** गोरख बाबर

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1991 **(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो तिसंगी, ता पंढरपूर, पंढरपूर ग्रामीण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो तिसंगी, ता पंढरपूर, पंढरपूर ग्रामीण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9322039323

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | किशोर भगवान मोहिते | | वडील चे नाव : भगवान मोहिते | 1. रो-हाऊस नं34,हरिकपा रेसिडेन्सी,Town/Village (शहर / गाव): गेट नं410,वाखरी,पंढरपूर,Tehsil (तहसील): पंढरपूर,Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | नितीन शिवाजी मेटकरी | | वडील चे नाव : शिवाजी मेटकरी | 1. गट नं75/1,गणपती नगर,Town/Village (शहर / गाव): पंढरपूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.21.01.2025

मी श्री. अविनाश गोरख बाबर, वय- 34 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. मु.पो. तिसंगी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर मो.नं. 9322039323 समक्ष हजर राहुन फिर्यादी जबाब देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून शेती करुन माझ्या कुटुंबाची उपजिवीका भागवतो. श्री शिवाजी गजानन शिंदे, वय 52 वर्षे, रा. साईनगर, सांगलीवाडी, ता. मिरज, जि. सांगली यांनी आमच्या तिसंगी गाव येथील गट नं. 95/1/ब या गटाची 20 गुंठे क्षेत्राची शेतजमिन विकत घेतली असून ते सांगली जिल्हयात राहण्यास असल्याने सदरची शेती त्यांच्यामार्फत मीच वाटेकरी म्हणून शेतजमीन पाहत आहे. आमच्या गावातील 1) सुमन संभाजी रुपनर यांची तिसंगी रस्त्याचे दक्षिणेस गट नं.79/1 हि शेतजमीन असून सदर गटातील 06 गुंठे जमीन त्यांनी विहीर प्रयोजनाकरीता खरेदी देण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांचेकडे अर्ज करून परवानगी मिळवली आणि त्यावेळी त्यांनी आमच्या 95/1 या गटातील 06 गुंठे जमीन दिशा चुकीची दाखवून गट नं.79/1 या गटाचे असल्याचे भासवून अमोल अभिमान रूपनर व इतर 04 यांना खरेदी दिली. त्यानंतर त्यांनी मला मी वाटेकरी म्हणून काम पाहत असलेल्या शेतजमीनीमधील काही जमीन त्यांचा असल्याचे सांगुन मला वहीवाटीस अडथळा आणल्याने शेतजमीनीचे मुळ मालक श्री शिवाजी शिंदे यांनी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर आम्ही गट नं.79/1 च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या खरेदीखताच्या फेरफार नोंदीस हरकत असलेबाबत तहसिलदार साहेब पंढरपूर यांच्याकडे अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने श्री एम.जी जाधव, मंडल अधिकारी खर्डी यांनी पुरावे व हरकत अर्जाचे अवलोकन न करता आमचा हरकतीचा अर्ज नामंजूर केलेबाबत आदेश पारित केला. त्यामुळे सदर आदेशाविरूध्द आम्ही आर.टी.एस. अपिल नं. 306/2023 अन्वये दि.13/08/2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर यांच्याकडे अपील केला आहे. सदर अपिलाच्या दाव्याच्या सुनावणीसाठी सदर शेतजमिनीचे मूळ मालक श्री शिवाजी गजानन शिंदे यांच्यावतीने मी हजर राहून कामकाज पाहत असतो. यादरम्यान दि.11/01/2025 रोजी मी सदर दाव्याच्या निकालाच्या अनुषंगाने चौकशीकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालयात जाऊन श्री किशोर मोहिते, महसूल सहाय्यक यांची भेट घेतली असता त्यांनी प्रांत साहेबांना सांगून निकाल तुमच्या बाजूने लावतो, पण त्यासाठी प्रांत कार्यालयातील श्री नितीन मेटकरी, शिपाई यांना भेटून ते सांगतील तेवढे पैसे आणुन दयावे लागतील व यापुढे त्यांनाच भेटून कामाबाबत विचारणा करावी, मला भेटण्यास अथवा परत परत विचारणा करण्यास येऊ नये असे सांगितले. किशोर मोहिते यांच्या सांगणेप्रमाणे मी श्री नितीन मेटकरी यांना भेटलो असता त्यांनी मोहिते साहेब हे प्रांतसाहेबांना सांगून आमच्याबाजुने निकाल लावतील असे सांगुन त्यासाठी त्यांच्या हातावर रु.60,000/- लिहुन इतके दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सगळी कागदपत्रे आमच्या बाजुने आहेत, कोर्टातील दाव्याचा अंतरिम निकाल आमच्या बाजुने लागले आहे असे सांगितले असता, त्यांनी मला आम्ही तुमच्या विरुध्द पार्टीकडून एक-दोन लाख रुपये घेवू शकतो, परंतु तुमच्या बाजूने निकाल

लावण्यासाठी फक्त रुपये साठ हजार मागत आहे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना मूळ मालक श्री शिवाजी शिंदे यांना विचारुन सोमवारी येतो असे सांगितले. मी घरी आल्यानंतर श्री शिवाजी शिंदे यांच्याशी फोनवरुन उपविभागीय अधिकारी कार्यालयातील श्री नितीन मेटकरी व किशोर मोहिते साहेब हे प्रांत अधिकारी यांना सागून निकाल आपल्याबाजुने लावून देतो असे म्हणून रु. 60,000/- ची मागणी करत असल्याचे सांगितले. त्यावेळी ते मी सोमवारी येतो त्यानंतर चर्चा करू असे मला शिवाजी गजानन शिंदे यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर येथे आर.टी.एस. अपिल नं. 306/2023 अन्वये प्रलंबित प्रकरणाचे निकाल आमच्याबाजुने लावून देतो म्हणून श्री नितीन मेटकरी व श्री किशोर मोहिते हे रु.60,000/- ची लाचेची मागणी करीत असल्याची खात्री झाल्याने दि.13/01/2025 रोजी शेतजमीनीचे मुळ मालक श्री शिवाजी गजानन शिंदे व मी स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे समक्ष हजर राहून आमच्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक पिंगुवाले यांनी दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेऊन तक्रारीचा आशय पंचाना समजावून सांगुन तक्रारीची पडताळणी करायचे असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी श्री शिवाजी शिंदे व मला पंढरपूर येथील 65 एकर दिंडी स्थळ येथे जाऊन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व श्री शिवाजी शिंदे दोघे सदरठिकाणी गेल्यानंतर काहीवेळाने पोनि पिंगुवाले, दोन्ही पंच व सापळा पथक शासकीय वाहनाने दुपारी सुमारे 14.00 वाचे सुमारास येऊन आमची भेट घेतली. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिती सांगून त्यामध्ये नविन मेमरीकार्ड घालून ते चालू करुन माझ्या गळयात अडकावून मला पंच क्र.1 जाधव यांच्यासह श्री शिवाजी शिंदे यांची कार एमएच 10/डीएल 4126 मधून रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 दोघे प्रांत कार्यालयात जावून श्री मेटकरी यांची भेट घेतली असता, त्यांनी श्री मोहिते यांना भेटण्यास सांगितले, सदरठिकाणी मोहिते साहेब न दिसल्यामुळे मी त्यांना त्यांच्याबाबत विचारणा केली असता मोहिते साहेब जेवायला गेल्याचे समजले. थोडया वेळाने मोहिते साहेब कार्यालयात आल्यावर मी त्यांची भेट घेतली असता, त्यांनी मला क्लोज झाली आहे. महिना भर लागील अजून असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा मेटकरी साहेबांकडे येवून होय मेटकरी साहेब.. तुम्ही बोला ओ.. काय आपल ठरल्याप्रमाणे.. असे सांगितले असता त्यांनी बोलतो बोलतो मी.. बोलतो.. बोलतो मी त्याला उद्या.. आता तारखा हायत त्यापुढ.. असे सांगुन चर्चेदरम्यान पुन्हा बोलतो मी त्याला.. तारखा झाल्यावर बोलतो.. पाच वाजता या.. चार-पाच वाजता चक्कर मारा.. असे सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.1 जाधव असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येऊन झालेली हकिकत सांगितली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉडर लॅपटॉपला लावून आमच्यात झालेल्या संभाषण ऐकून खात्री केली.

श्री.मेटकरी यांनी मला चार-पाच वाजण्याच्या सुमारास बोलावले असल्याने त्यादरम्यान पोनि पिंगुवाले यांनी पडताळणीच्या अनुषंगाने पुन्हा आवश्यक त्या सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकवून पंच क्र.1 यांच्यासह रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही प्रांत कार्यालयात जावून श्री मेटकरी यांची भेट घेतली असता, त्यांनी सुरूवातील मला थांबवून थोडयावेळाने मला जा की तीकड उभारलय जा की एकटच.. असे सांगून मोहिते यांची भेट घेऊन

काय असल ती देतो म्हणाव साहेब चला म्हणाव.. जा.. असे बोलण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी मोहिते साहेबांना भेटून मेटकरी यांनी भेटण्यास सांगितले आहे असे सांगितले असता, त्यांनी अहो मग..मेटकरी साहेब काय म्हणत्यात ती मेटकरी साहेबांनाच विचारा की.. असे बोलून पुन्हा मेटकरी यांच्याकडे पाठवून दिले. त्यांनतर थोडया वेळाने मेटकरी यांनी मला बोलावून घेऊन सांगना तु.. सांग आता..एकदाच सांग फायनल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना काय काय झाल म्हणल असे विचारले असता, त्यांनी तु सांग आता फायनल किती देणार हाय आता..मी तुला सांगितलय काल असे सांगितले. त्यावर मी त्यांना काय म्हणला.. असे विचारले असता त्यांनी काल सांगितल का नाय..आता तुझ लास्ट सांग म्हणजी मला बोलायला बर.. असे बोलून लाच रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना साठ हजार रुपये लय होतेत ओ..जरा थोड असे बोलून तडजोड करण्याची विनंती केली असता त्यांनी किती? सांग मग एकच आकडा.. असे मला बोलले. त्यावेळी मी लाच रकमेबाबत तडजोड केली असता, त्यांनी फीफ्टी फाय असे म्हणून सांगितले. त्योवळी मी त्यांनी इंग्लीश समजत नसल्याचे सांगितले असता त्यांनी पन्नास अन पाच असे म्हणुन पंच्चावन्न हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना पंच्चावन्न का असे विचारले असता, त्यांनी आता ती विचारले शेवट लास्ट…नसेल तर तुमच्या तुमच्या मार्गान असे सागून माझ्याकडे रु. 55,000/- लाचेची मागणी केली. त्यांनतर त्यांनी उद्या परवा कधी आणायच त्याटायमाला आणा..शनिवार रविवार तुमच्या हातात कागद.. असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना पैसे घेवून कधी येऊ द्या.. असे विचारले असता श्री मेटकरी यांनी कधी पण ये..तु उद्या ये, परवा ये, तेरवा ये..कधीपण ये..उद्या सणासुदीच वाटलस राहुदे…परवादिवशी ये.. असे सांगुन दोन दिवसानंतर येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.1 जाधव दोघे पोनि पिंगुवाले यांची भेट घेवून घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील लॅपटॉपला जोडून वरील संभाषणाची खात्री केली. श्री मेटकरी यांनी तडजोडीअंती रु. 55,000/- लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले असून सदर लाच रक्कम त्यांनी दोन दिवसानंतर घेवून येण्यास सांगितल्याने, दोन दिवसानंतर पुढील कारवाई आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर दि.15/01/2025 रोजी सकाळी 11.45 वाजेच्या सुमारास पोनि पिंगुवाले यांनी सापळा पथक व पंच असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहनाने पंढरपूर येथील दिंडी स्थळ 65 एकर येथे आल्यावर मी त्यांची भेट घेतली, त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी झालेल्या पडताळणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई करायचे ठरवुन श्री मेटकरी यांनी मागणी केलेली लाच रक्कम रुपये 55,000/- मला हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या बचतीमधील 55,000/- रू. रक्कम हजर केले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी सर्व नोटांचे नंबर त्यांचेकडील अंमलदाराच्या साहाय्याने लिहून घेतले त्यानंतर अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याची माहिती सांगुन त्यांचेकडील अंमलदाराकरवी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावून ते माझ्या पॅन्टच्या खिशात ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईकरीता व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड घालून व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकवून पंच क्र.1 जाधव यांच्यासह प्रांत कार्यालयाकडे रवाना केले. सदरवेळी पोनि पिंगुवाले व उर्वरित सापळा पथक शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येऊन प्रांत कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबले. मी व पंच क्र.1 दोघे श्री मेटकरी यांची भेट घेवून पैशे आणलेबाबत सांगितले असता, त्यांनी तुझ काम करतो.. त्याच्यापाशी काय विषय नाही.. पैसे तुझ्यापाशी ठेव.. पैसे पाहिजे त्याटायमाला तुझ्यापासन

घेतल जातील.. त्या पैश्याप्रमाण तुझ तूला दिल जातील.. अजून काय सांगु मराठीत असे बोलून शनिवारी येण्यास सांगितले, तसेच त्यांनी शनिवारी या अकराच्या पुढ.. समोरासमोरल टाईप करतय ती.. असे बोलून मोहिते साहेब टाईप करतय.. असे सांगितले. त्यावेळी चर्चेदरम्यान मी त्यांना मोहिते साहेबांना पैसे आणलेबाबत सांगण्यास बोललो असता श्री मेटकरी यांनी ऐका.. तोंडातन लई खोट बोलत नाही.. मोहीते साहेबांनी सांगितलय त्यांना शनिवारी कसल्याबी परिस्थितीत बोलवून घ्या.. म्हणून मी तुम्हाला म्हणतो.. पैसे.. फक्त तुम्ही तयारीत राहायच.. आले की दिले.. असे सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र. 1 दोघे सदर कार्यालयातून बाहेर पडलो आणि रोंगे हॉस्पिटल जवळ जाऊन थांबलो. त्यावेळी पोनि पिंगुवाले व सापळा पथक त्याठिकाणी येवून माझ्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर काढून घेऊन घडलेली हकिकत विचारून घेतली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईस रेकॉर्डर त्यांच्याकडील लॅपटॉपला जोडून संभाषणाची खात्री केली. श्री मेटकरी यांनी मला शनिवारी बोलावले असल्याने त्याप्रमाणे सापळा कारवाई करण्याचे ठरवून दि.15/01/2025 रोजीची कारवाई स्थगित केली.

दि.17/01/2025 रोजी मेटकरी यांनी मला फोन करून कागदपत्रे आणण्यास सांगुन मला भेटण्यास बोलावले, सदरबाबत मी पोनि पिंगुवाले यांना फोनवरुन माहिती दिली असता त्यांनी पुढील कारवाई करण्याचे अनुषंगाने दुपारी 1.15 वाजेच्या सुमारास पंढरपूर येथील रोंगे हॉस्पीटलजवळ बोलावून माझी भेट घेतली, त्यावेळी मी श्री मेटकरी हे माझ्याकडे जुना उतारा मागत असल्याचे सांगितले, त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने मी दि.15/01/2025 रोजी हजर केलेल्या नोटांना स्टॉफकरवी पुन्हा एकदा अँन्थ्रासिंन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या डाव्याबुजच्या खिशात ठेवली व उता-याची कागदपत्र सोबत घेवून जाण्याच्या सूचना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड घालून ते चालू करुन माझ्या गळयात अडकवून पंच क्र.1 जाधव याच्यासह प्रांत कार्यालयाकडे रवाना केले. त्यावेळी सापळा पथक प्रांत कार्यालयाचे बाहेर सापळा लावून थांबले. मी पंच क्र.1 यांच्यासह जाऊन श्री मेटकरी यांची भेट घेऊन त्यांना ऐका की तुम्ही सांगितलेल्या पध्दतीन कागद अन ही पंचावन हजार रुपये असे सांगितले असता, त्यांनी राहुदे..मी घेतो म्हणल की घेतो भावा..ही मला कागद त्यात कमी होती..ती तर नको दाखवायला.. असे सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान त्यांनी आल की देतो.. असे बोलून मोहिते यांच्याकडे कागद देणार असल्याचे सांगून फोन केल्यावर येण्यास सांगितले. त्यामुळे मी पुन्हा सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत जाऊन झालेली हकिकत पोनि पिंगुवाले यांना सांगितली. त्यानंतर सायंकाळी 5.00 वा चे सुमारास मी श्री मेटकरी यांना फोन केला असता त्यांनी मला फेरफार उतारा घेवुन येण्यास सांगितले. सदर संभाषण व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले आहे. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांच्या सुचनेप्रमाणे फेरफार उतारा व लाच रक्कम सोबत घेवून मी व पंच क्र.1 दोघे माझ्या मोटारसायकलवरून प्रांत कार्यालयात जाऊन श्री मेटकरी यांना भेटून फेरफार उतारा आणलेबाबत सांगितले असता, त्यावेळी त्यांनी मला श्री मोहिते यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 दोघे श्री मोहिते यांना भेटलो असता त्यांच्याशी कागदपत्रे, सातबारा व फेरफार उता-याबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान श्री मोहिते यांनी ओके ओके..ठीक हाय बघतो मी..तुमच्याकड नाय म्हणल्यानंतर बघतो मी.. असे बालून काम पुर्ण करण्याची शाश्वती दिली. त्यानंतर मी बर बर चालतय चालतय..ती मेटकरी साहेब

म्हणलेत त्याप्रमाणे आं.. असे म्हणून पॅन्टीच्या खिशाकडे हाताने खुणवून पैशे आणलेबबात मोहिते यॉंना सांगितले असता, त्यांनी अहो कसकाय.. मेटकरी साहेबांना बोलायच असत.. तुमाला काय आता..असे बोलून पैश्याबाबत श्री मेटकरी यांच्याशीच बोलण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना पैशाबाबत मेटकरी साहेबांना भेटू का मी.. असे विचारले असता, त्यांनी भेट जा..असे बोलून मानेने होकार दिला. श्री मोहिते यांच्या सांगणेप्रामणे मी श्री मेटकरी यांना भेटलो असता, त्यांनी मला मी फोन केला की फक्त घेवून यायच फक्त असे बोलून त्यांनी फोन केल्यावर लाच रक्कम घेऊन येण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.1 दोघे रोंगे हॉस्पिटल जवळ जाऊन पोनि पिंगुवाले यांची भेट घेतली आणि वरीलप्रमाणे घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यंानी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील लॅपटॉपला जोडून संभाषणाची खात्री केली. त्यामध्ये श्री मोहिते यांनी देखील लाच रक्कमेबाबत दुजोरा दिला. त्यानंतर श्री मेटकरी यांचा फोन आल्यावर पुढील कारवाई करण्याचे ठरवून दि.17/01/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यांनतर आज दि.20/01/2025 रोजी दुपारी 1.00 वा.चे सुमारास श्री मेटकरी यांनी मला फोन करून पैसे घेऊन येण्यास सांगितले. त्यांतनर मी लगेच पोनि पिंगुवाले यांना फोनवरुन कळवले असता, त्यांनी मला सायंकाळी सुमारे 04.00 वाचे सुमारास रोंगे हॉस्पिटलजवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदरवेळी व ठिकाणी पोनि पिंगुवाले यांची भेट घेतली. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने यापुर्वी मी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिंन पावडर लावुन त्या माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवले आणि व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड घालून व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकवून पंच क्र.1 जाधव याच्यासह माझ्या मोटारसायकलवरून प्रांत कार्यालयाकडे रवाना केले. त्यावेळी सापळा पथक सदर ठिकाणी सापळा लाऊन थांबले. मी प्रांत कार्यालयात जाऊन श्री मेटकरी यांची भेट घेतली असता, मेटकरी यांनी मला चहा वगैरे घेऊन थोड्यावेळाने येण्यास सांगितले, त्यामुळे आम्ही कार्यालयातून बाहेर पडून पोनि पिंगुवाले यांची भेट घेऊन हकिकत सांगितली, त्यानंतर थोडयावेळाने पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळयात व्हॉईसरेकॉर्डर चालू करून ते अडकावून मला पंच क्र.1 जाधव यांच्यासह प्रांत कार्यालयाकडे रवाना केले. सदरवेळी पोनि पिंगुवाले व सापळा पथक प्रांत कार्यालयाचे बाहेर सापळा लावून थांबले. मी व पंच क्र.1 जाधव दोघे मिळून प्रांत कार्यालयात जाऊन श्री मेटकरी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला फोन उचलत जा की..ते विरूध्द पार्टी आलत आता इथ.. म्हणून तुला इकड येऊ नको म्हणत होतो.. असे सांगुन थोडावेळ प्रांत कार्यालयाच्या आवारात थांबण्यास सांगितले. त्यानंतर काहीवेळाने श्री मेटकरी यांनी मला हाताने इशारा करून बोलावले आणि द्या की आता.. असे बोलून लाच रकमेची मागणी केली. त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या खिशात ठेवलेली 55,000/- रू लाच रक्कम काढून त्यांच्यासमोर धरले असता, त्यांनी ते उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेवले, त्यावेळी मी त्यांना मोहिते साहेबांना भेटून चर्चा करू असे बोललो असता त्यांनी मला एस बॉस असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला अरे पण मी त्यांना आणणारच होतो.. पण आता हिकड आलोय म्हणून तुझ्याकडून घेतले पैसे.. मला.. तिथ.. तिथ ह्यालाच द्या म्हणणार होतो पैसे असे सांगितले. त्यावेळी मी एकदा मोहिते साहेबाला बोलवा असे सांगितले असता त्यांनी आत नाही बोलता येत नाही म्हणल तर.. तिथ सगळ कॅमेरे हायत.. इकड बोलवतो की मी..असे सांगुन प्रांत कार्यालयाच्या आत जात असताना मी पोनि पिंगुवाले यांना मिस कॉल करून लाच रक्कम

स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा दिला. त्यावरून पोनि पिंगुवाले व सापळा पथक सदर ठिकाणी येऊन श्री मेटकरी व श्री मोहिते यांना ताब्यात घेतले.

तरी दि.13/01/2025 रोजीचे 14.14 वा. पासून ते आज दि.20/01/2025 रोजीचे 18.21 वा.चे दरम्यान उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर येथील आरोपी लोकसेवक 1) श्री किशोर भगवान मोहिते, वय-36 वर्षे, पद- महसूल सहायक, नेम-उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर रा. रो-हाऊस नं.34, हरिकृपा रेसिडेन्सी, गेट नं.410, वाखरी, पंढरपूर व आरोपी लोकसेवक 2) नितीन शिवाजी मेटकरी, वय-53 वर्षे, पद- शिपाई, नेम-उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर रा.गट नं.75/1, गणपती नगर, पंढरपूर, जि. सोलापूर यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर येथे प्रलंबित असलेल्या आर.टी.एस. अपिल नं.306/2023 या दाव्याचा निकाल आमच्या बाजूने देतो असे सांगुन त्याकरीता आरोपी लोकसेवक क्र. 2) नितीन शिवाजी मेटकरी यांनी 60,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीवरून 55,000/- लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आणि आरोपी लोकसेवक क्र.1) किशोर भगवान मोहिते यांनी त्यास दुजोरा देऊन आरोपी लोकसेवक क्र.2 यांना भेटण्यास सांगितले. त्यानंतर दि.20/01/2025 रोजी आरोपी लोकसेवक क्र.2) श्री नितीन शिवाजी मेटकरी यांनी शासकीय पंचासमक्ष माझ्याकडून 55,000/- रू लाचेची रक्कम स्विकारून लोकसेवा प्रदान करण्याकरीता अयोग्यरित्या बेकायदेशीर पारितोषण मिळवून आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्‌देशाने गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणून माझी आरोपी लोकसेवक क्र.1) श्री किशोर भगवान मोहित व आरोपी लोकसेवक क्र.2) नितीन शिवाजी मेटकरी यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष स.ता.म.

(गणेश पिंगुवाले)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vishvjeet bhagvanrao ghodke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्‌दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** vishvjeet bhagvanrao ghodke

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DCPS15101000402VBGM8101J

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1989 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1991 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**